महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)

इयत्ता : तिसरी

---

**कविता**

संदर्भ :- निवडक किशोर

कवी :- **विंदा करंदीकर**

**पाऊस**

पाऊस मुलांचा
पानांचा, फुलांचा
पडतो टपटप
जातो झपझप
भिजवतो दप्तर
पुसतो पाटी
फुलपाखरांच्या
लागतो पाठी
पाऊस मुलांचा
झुलत्या झाडांचा
पडतो रिमझिम
खेळतो लेझिम
भर रस्त्यावर
घेतो लकेर
घराच्या भोवती
धरतो फेर
पाऊस मुलांचा
हिरव्या चाऱ्यांचा
पडतो सरसर
जातो झरझर
मोठ्यांच्या बरोबर
घेतो कट्टी
मुलांच्या बरोबर
करतो गट्टी
पाऊस मुलांचा
झुळझुळ झऱ्यांचा
घालतो फुगडी
नागडी उघडी
नाचवतो गाणे
'डिंगेरी डिम्मा'
केळींच्या बरोबर
खेळतो झिम्मा
पाऊस मुलांचा
पानांचा, फुलांचा
येतो भुरकन
जातो झरकन
मध्येच काढतो
उन्हाची कळ
वाऱ्याला भिऊन
मारतो पळ

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : तिसरी

---

**प्रश्न :-**

खालील प्रश्नांची उत्तरे लिही.

१) कवितेत आलेल्या खेळांची नावे सांग.

२) पाऊस कोणाचा म्हटले आहे ? तीन नावे लिही.

३) पाऊस कोणासोबत कट्टी घेतो ?

४) पाऊस कसा पडतो, याचे वर्णन करणारे शब्द लिही.

५) झरा कसा वाहतो आहे ?

६) पाऊस कोणाच्या पाठी लागला आहे ?

७) तुमच्या शब्दात पावसाचे वर्णन करा.

८) पुढील वाक्यासमोर कवितेतील योग्य शब्द लिही आणि ओळ पूर्ण करा.

भिजवतो -----------

पुसतो --------------

मोठ्यांच्या बरोबर घेतो ------------

मुलांच्या बरोबर करतो -------------

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : तिसरी

---

संदर्भ :- निवडक किशोर

कवयित्री :- **शैलजा केतकर**

## वर्गात

एवढासा खडू
फळ्यावर लिहितो
छान छान अभ्यास
शिकवत बसतो.

एवढंसं डस्टर
अभ्यास पुसतं
नवंनवं शिकवा
म्हणत बसतं.

एवढासा फळा
असून काळा
अभ्यासाचा फुलवतो
मळाच मळा

**प्रश्न :-**

एका वाक्यात उत्तरे लिहा.

अ) वर्गात डस्टरचं काम काय ?

ब) नवंनवं शिकायला कोण सांगत आहे ?

क) खडूचा वापर कुठे करतात ?

ड) तुमच्या वर्गातील फळ्याचा रंग सांग.

ढ) कवितेत वर्गातील कोणत्या वस्तूंची नावे आली आहेत ?

ण) कवितेत दोनदा येणारे शब्द शोध. उदा. छान छान

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : तिसरी

---

**सूचनाफलक**

**<u>मनोरंजन उद्यान</u>**
**<u>नागरिकांसाठी सूचना</u>**

**उद्यानाची वेळ** - सकाळी ८ ते १२ व संध्याकाळी ४ ते ८

**उद्यानात येणा-यांनी खालील सूचना पाळाव्यात व आपले उद्यान सुंदर ठेवावे.**

- झाडांची पाने व फुले तोडू नयेत.
- बागेत खाण्याचे पदार्थ आणू नयेत.
- कचरा कचराकुंडीतच टाकावा.
- बागेत पाळीव प्राणी आणू नयेत.
- फक्त १२ वर्षांखालील मुलांनी झोपाळे व घसरगुंड्या यावर खेळावे.

**नवीन शब्द :-** उद्यान - बाग

**प्रश्न:-**

१ बागेचे नाव काय आहे?

२ बाग दररोज किती ते किती उघडी असते?

३ किती वर्षांखालील मुलांना झोपाळ्यावर खेळण्याची परवानगी आहे?

४ पाळीव प्राण्यांविषयी बागेत काय नियम आहे?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : तिसरी

---

**अनुभव**

बाळाने मोठे भोकाड पसरले. आई चुलीपाशी होती. हात धुवून ती लगेच आत आली. तिन बाळाला जवळ घेतले. बाळ रडायचे थांबले. खुदकन हसले.

**प्रश्न :-**

१) आई कोठे होती?

२) ती का आत आली?

३) बाळ रडायचे कधी थांबले?

**बातमी**

धुळे, दि. १५ ऑगस्ट (आमच्या बातमीदराकडून): आज दि. १५ ऑगस्ट रोजी पिंपळनेर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात पार पडला. गावच्या सरपंचांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. शाळेतल्या मुलामुलींनी तालासुरात ध्वजगीत गाऊन सर्वांची मने जिंकली. सरपंचांनी, “शाळेला जी मदत लागेल ती देऊ,” असे जाहीर केले. मुख्याध्यापक श्री. गावडे सरांनी खासकरून सरपंचांचे व बाकी सर्वांचे आभार मानले.

**प्रश्न :-**

१) ही बातमी कोणत्या गावातील आहे?

२) शाळेचा झेंडा कुणी फडकवला?

३) गाणाऱ्या मुलांचा आवाज गोड होता हे तुला कोणत्या वाक्यावरून कळले ते लिही.

४) मुख्याध्यापकांनी सरपंचांचे विशेष आभार का मानले असावेत?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : तिसरी

---

**कोडी**

१) पाय आहेत पण चालत नाही, तर मी कोण?

२) छताला उलटा लटकून तुम्हा सर्वांना वारा घालतो, तो कोण?

३) आकाशात उडतो पण पक्षी नाही. शेपटी आहे पण प्राणी नही, तो कोण?

४) कान आहे पण ऐकू येत नाही, तो कोण?

**चिठ्ठी**

प्रिय मुलांनो,

आज मी कामामुळे शाळेत येऊ शकणार नाही. तुम्ही सर्वांनी आपापले दिलेले काम करत रहा. काम झाल्यावर पुस्तक पेटीतील आवडीचे पुस्तक घेऊन वाचा. शेवटच्या तासिकेला मैदानावर खेळायला जा.

तिसरीच्या मुलांनी दुसरीच्या मुलांना वाचायला मदत करा.

तुमचे गुरुजी

श्री. डाबरे सर

**प्रश्न :-**

१) चिठ्ठी कोणी लिहिली आहे? का?

२) अपापले काम झाल्यावर मुलांनी काय करायचे आहे?

३) तिसरीच्या मुलांनी कोणाला कशासाठी मदत करायची आहे?

४) शाळेत वाचनालय आहे का? तुला कशावरून कळले ते लिही.